MHKO100003292022

**नियमीत दिवाणी दावा क्र. ७५/२०२२**

मयोद्दीन मुल्ला.
//वि//
निखत मुल्ला.

**निशाणी क्र. १५ वर आदेश**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी हिने अंतरिम पोटगी मिळणेकरीता दाखल केलेला आहे. वादीतर्फे सदर अर्जास नि.१६ वर म्हणणे दाखल केले. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

०२. प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, वादी यांनी सदरचा दावा हा मुस्लीम कायद्याप्रमाणे नांदवणूकीस येणेबाबत दाखल केलेला आहे. दाव्याचे कामी प्रतिवादी यांनी आपली कैफियत व हकीकत सादर केलेली आहे. वादी यांनी प्रतिवादीस शारिरिक व मानसिक त्रास दिलेने त्याबाबतची तक्रार गडहिंग्लज पोलीस स्टेशन येथे दिली, त्यानंतर प्रतिवादीबरोबर बोलणी करायचे सांगून तिला सामानगड येथे घेऊन जाऊन त्याठिकाणी तिला मारहाण व शिवीगाळ करुन हाकलून दिलेले आहे. तेव्हापासून प्रतिवादी ही मुलगा नौमान यास घेऊन नाईलाजास्तव गोवा येथे आईवडीलांबरोबर राहत आहे.

०३. वादीचा दावा चालणेस बराच कालावधी लागणार आहे. प्रतिवादी हीस वादीने घरातून हाकलून दिलेपासून तिच्या दैनंदिन जीवनावश्यक गरजेसाठी, औषधोपचारासाठी आजअखेर कोणतीही सोय केलेली नाही. प्रतिवादी हिस उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही अगर त्यांच्या आई-वडीलांची आर्थिक परिस्थिती नाही. त्यामूळे, प्रतिवादीचे जीवन जगणे असहय असे झालेले आहे. तसेच, प्रतिवादी हीस नेमले तारखेस गोव्याहून गडहिंग्लजला यावे लागते. त्याचा जाणे-येणेचा खर्च व राहणेचा खर्च प्रतिवादी यांना सोसणे अशक्य झालेले आहे. वादी यांचे गडहिंग्लज येथे फुलविक्रीचा होलसेल व्यवसाय आहे. त्यापासून वादी यांना प्रत्येक दिवशी कमीत कमी खर्चवजा जाता ५,०००/-रू. नफा मिळतो. तसेच लग्नसमारंभ, सणासुदीच्या वेळी तसेच उत्सव कालावधीमध्ये त्यांचा फुलांचा व्यापार मोठया प्रमाणात होत असून त्या कालावधीमध्ये कमीत कमी १,००,०००/- इतके आर्थिक उत्पन्न प्राप्त होते. प्रतिवादी व मुलगा नौमान यांच्या दैनंदिन खर्चाकरिता, औषधापचार व पोटयापाण्याकरिता तसेच येणे-जाणे करिता

प्रति महिना रक्कम रू.१०,०००/- अंतरिम पोटगी मिळणे गरजेचे आहे. सबब, प्रतिवादीने अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

०४. प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज या दाव्यात चालणेस पात्र आहे याकरीता मा. मुंबई उच्च न्यायालयाचे Mohammed Anisulhaq Vs. Asma Anjum, Laws (Bom) 2010 8 152 या प्रकरणातील न्यायनिर्णयाचा आधार घेतलेला आहे.

०५. वादी यांनी सदर अर्जास निशाणी क्र.१६ येथे म्हणणे दिले व अर्जातील संपुर्ण कथने नाकारलेली आहेत. वादीने असे कथन केले की, प्रतिवादी हिने याकामी कोणताही प्रतिदावा वादीविरुद्ध दाखल केलेला नाही. या कारणास्तव प्रतिवादी हिचा अर्ज चालणेस पात्र नाही. वादी यांनी दावेत कथन केलेप्रमाणे प्रतिवादी हिने स्वतःहून वादीचा त्याग केला आहे. प्रतिवादी हिला वादीकडे नांदवणूक करणेची नाही. यामुळे प्रतिवादी हिने उध्टपणाने वागून वादीचा त्याग केला आहे. प्रतिवादी ही तिचे आई-वडील यांना बोलावून घेवून भांडण काढून वादीचे घरातून निघून गेली आहे. त्यावेळी वादी व गावातील पंचानी प्रयत्न करूनही प्रतिवादी व प्रतिवादीचे आई-वडील ऐकलेले नाहीत व वादीकडे नांदवणूक केली नाही. त्यावेळी वादी यांनी पोलिस स्टेशन, गडहिंग्लज येथे प्रतिवादी व त्यांचे आई-वडील यांचे विरूध्द दिनांक २९/०१/२०२२ रोजी तक्रार दिली होती. प्रतिवादी हिला सदर दावेची समन्स लागू होवूनही वेळेत प्रतिवादी हिने कैफियत दिली नव्हती. यावरून ही प्रतिवादी हिचा मुद्दाम वादीस त्रास देणेचा उद्देश आहे हे दिसून येते. सदर दावेचे कामी नि.१२ ला मुद्दे काढलेले आहेत व सदरचे काम चौकशीस नेमले आहे.

०६. वादीचा सदरचा दावा मुस्लीम कायदयाप्रमाणे प्रतिवादीने वादीकडे नांदणुकीस येणेसाठी आहे. वादी यांनी या दावेचे कामी मुद्दे काढलेनंतर नियमाप्रमाणे वादीचे साक्षीदारांची साक्षी यादी दिलेली आहे. त्यानंतर सदरचे काम चौकशीस असलेने वादीने सरतपासही दिनांक २९/०९/२०२२ रोजी दिलेला आहे. त्यामुळे, प्रतिवादी तर्फे वादीचा उलटतपास घेणे आवश्यक होते व आहे व सदरचे काम गुणदोषावर चालणे आवश्यक आहे. असे असता मुद्दाम प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे व काम चालविणेस प्रतिवादी ही टाळाटाळ करीत आहे. प्रतिवादी ही सदर अर्जात कथन करते तसा कोणताही वादीचा फुले विक्रीचा होलसेल व्यवसाय नाही व तसे कोणतेही दुकान नाही. प्रतिवादी कथन करते की, वादीस प्रत्येक दिवशी खर्च वजा जाता ५,०००/- रूपये नफा मिळतो ते

खोटे व लबाडीचे आहे. प्रतिवादीने मुद्दाम पोटगी मिळणेसाठी कांहीतरी कारण दाखवावे म्हणून खोटे व लबाडीने वादीचे उत्पन्नाबाबत नमुद केले आहे व वादीला त्रास देणेसाठी सदरचा अर्ज दिला आहे. प्रतिवादी ही शिक्षित आहे व गोवा येथे नोकरी करते. असे असता सदरचा खोटा व लबाडीचा अर्ज वादीविरूध्द दिलेला आहे. सबब, वादीने अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

०७. वादी यांनी प्रतिवादीचा प्रस्तुतचा अर्ज या दाव्यात चालणेस पात्र नाही याकरीता मा. मद्रास उच्च न्यायालयाचे M. Jainoon Vs. M. Ammanulla Khan & ors., AIR 2000 Madras 381 या प्रकरणातील न्यायनिर्णयाचा आधार घेतलेला आहे.

०८. दोन्ही बाजूंचे कथनांचे अवलोकन केल असता असे दिसून येते की, वादी व प्रतिवादी हे पती-पत्नी असून प्रतिवादी हिने वादीविरुध्द प्रस्तुतचा अर्ज पोटगीकरीता दाखल केलेला आहे. वादीतर्फे प्रतिवादीचा प्रस्तुतचा अर्ज या दाव्यात चालण्यास पात्र नाही या स्वरुपाचा युक्तीवाद करण्यात आलेला आहे. याऊलट, प्रतिवादीतर्फे प्रस्तुतचा अर्ज या दाव्यात चालण्यास पात्र आहे या स्वरुपाचा युक्तीवाद करण्यात आलेला आहे. तसेच, प्रतिवादीतर्फे गोवा येथील न्यायालयात प्रतिवादी हिने दाखल केलेल्या अर्ज क्र. PWDVA/7/2022/E या प्रकरणामध्ये दिनांक ०९/११/२०२२ रोजीचे आदेशाची प्रत प्रतिवादीने निशाणी क्र.१८ वरील दस्तयादीसोबत व वादीने निशाणी क्र.२० वरील दस्तयादीसोबत दाखल केलेली आहे.

०९. वर नमुद प्रतिवादी हिने दाखल केलेला अर्ज क्र. PWDVA/7/2022/E मधील आदेशाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर गोवा येथील न्यायालयाने प्रतिवादी हिस दरमहा रक्कम रु. १०,०००/- पोटगी देणेबाबत आदेशीत केलेले आहे. सदर गोवा येथील न्यायालयामध्ये पोटगी बाबत झालेल्या आदेशाची बाब दोन्ही बाजूंना मान्य आहे. त्यामुळे, प्रतिवादी हिस यापूर्वी सक्षम न्यायालयाने पोटगी दिलेली असताना प्रतिवादी ही प्रस्तुत अर्जात पोटगी मिळणेस पात्र आहे अथवा कसे हे पाहणे आवश्यक आहे.

१०. प्रस्तुत अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादीने वादी याचे उत्पन्नाबाबत कथन करुन तिस दरमहा रक्कम रु. १०,०००/- पोटगी देण्याची

विनंती केलेली आहे. परंतु, सदर वादीचे उत्पन्नाबाबत कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. प्रतिवादी हिस गोवा येथील न्यायालयाने वर नमुद प्रकरणात रक्कम रु. १०,०००/- पोटगी मंजुर केलेली आहे. त्यामुळे, प्रतिवादी ही सदर गोवा येथील न्यायालयाने मंजुर केलेली पोटगी रक्कमे व्यतिरिक्त या प्रकरणात कोणताही सबळ पुरावा दाखल न केल्यामुळे अधिकची पोटगी मिळणेस पात्र नाही. त्यामुळे, वादी व प्रतिवादी यांचेतर्फे प्रस्तुतचा अर्ज हा कायद्याप्रमाणे चालणेस पात्र आहे अथवा कसे ही बाब विचारात न घेता केवळ प्रतिवादी हिस पूर्वीच सक्षम न्यायालयाने रक्कम रु. १०,०००/- पोटगी दिलेली असल्याने प्रस्तुतचा अर्ज निकाली काढण्यात येत आहे. त्यामुळे, वर नमुद दोन्ही बाजूंतर्फे दाखल न्यायनिर्णयांतील निरिक्षणे प्रस्तुत अर्ज निकाली काढताना विचारत घेणेत आलेले नाहीत. सबब, वर नमुद विवेंचनानुसार प्रतिवादी हिस गोवा येथील सक्षम न्यायालयाने रक्कम रु. १०,०००/- पोटगी मंजुर केलेली असल्याने, प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी ही अधिकची पोटगी मिळणेस पात्र नाही. त्यामुळे, खालील आदेश पारित करण्यात येतो.

**-: <u>आदेश</u> :-**

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

(खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)

Digitally signed by SUJIT AMBADAS RATHOD
Date: 2023.06.28 17:53:59 +0530

**( एस. ए. राठोड )**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांकः २८/०६/२०२३.

Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Patil. |
| Name of Court | S. A. Rathod,<br>2nd Jt. Civil Judge Jr. Dvn. and Judicial Magistrate First Class, Gadhinglaj. |
| Date of Dictation | 28/06/2023 |
| Order signed by P.O. on | 28/06/2023 |
| Order uploaded on | 28/06/2023 |